# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११०

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/सन २०१६ | ५१०८ दि.३१/०८/२०१६

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. शासन अधिसूचना , महसूल व वनविभाग क्र.प्राफेब ११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/१-१० दि.२१/०९/१३
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११ सप्टेंबर २०१४
५. प्राधिकरणाकडील आदेश क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/५४९/२०१४ दिनांक १०/१०/२०१४
६. शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक पदनि २०१४/प्र.क्र.२४५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक ०१/०८/२०१६
७. शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक राजस २०१६/प्र.क्र.२३५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक २०/०८/२०१६

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद आहे. आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अधिसुचीत करण्यात आलेले आहेत. नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२(८) नुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे . सहकारी संस्थांचे निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमतील नियम ३ अन्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची नेमणूक करण्याचा अधिकार आहेत . आणि,

ज्याअर्थी, प्राधिकरणाकडील दिनांक १०/१०/२०१४ च्या आदेशान्वये संपूर्ण ठाणे जिल्हयातील सहकारी संस्थांचे निवडणूकीसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था ठाणे यांची नियुक्ती करण्यात आली होती . आणि,

ज्याअर्थी, ठाणे जिल्हयाचे विभाजन करुन पालघर , वसई , डहाणू , तलासरी , जव्हार , वाडा , मोखाडा , आणि विक्रमगड या तालुक्यांचा समावेश असणारा पालघर हा स्वतंत्र जिल्हा वाचावे क्र. ३ येथील अधिसूचनेनूसार दिनांक ०१ ऑगस्ट २०१४ पासून निर्माण करण्यात आलेला आहे . त्यानूसार शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक पदनि २०१४/प्र.क्र.२४५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक ०१/०८/२०१६ अन्वये नवनिर्मित पालघर

जिल्हयासाठी सहकार विभागातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था , पालघर हे पद निर्माण करण्यात आले आहे . तसेच शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक राजस २०१६/प्र.क्र.२३५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक २०/०८/२०१६ अन्वये श्री.एस.एस.राऊत यांची जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था , पालघर म्हणून यांची नियुक्ती करण्यात आली आहे . आणि ,

ज्याअर्थी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी ठाणे यांचेकडील नवनिर्मित पालघर जिल्हयातील पालघर , वसई , डहाणू , तलासरी , जव्हार , वाडा , मोखाडा , विक्रमगड या तालुक्यांचे वैधानिक क्षेत्रातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था पालघर यांना जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून नियुक्ती देणे आवश्यक आहे ,

त्याअर्थी सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणुक नियमातील नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारास अनुसरुन खालील स्तंभ २ मधील अधिकारी यांना , स्तंभ ३ मधील त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रासह , तसेच विभाग / राज्य / जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या परंतू ज्या सहकारी संस्थांचे मुख्यालय त्यांच्या जिल्हयात आहे . अशा सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकासाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे .

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था ठाणे | संपूर्ण ठाणे जिल्हा |
| २ | जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था , पालघर | संपूर्ण पालघर जिल्हा |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे निर्देशानुसार.**

**( डॉ.ए.बी.जोगदंड )**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग नवीमुंबई
२. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी ठाणे
३. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, पालघर
४. तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी (संबंधित सर्व)

**प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :**

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे